टी. वाय. बी. ए. – एस. ३

सत्र - पहिले

विषय – साहित्यविचार

घटक -१ साहित्याचे स्वरूप

# साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांचे विशेष

डॉ. महादेव कांबळे

सहयोगी प्राध्यापक

# साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांचे विशेष

- संवेदनात्मकता
- सूचकता
- भावनात्मकता
- विशिष्टता व विश्वात्मकता
- वैचारिकता
- सेंद्रियत्व

## प्रस्तावना :

साहित्यातून व्यक्त होणाऱ्या विशेषण पैकी होणाऱ्या अनुभव हा विशेष महत्त्वाचा आहे. अनुभव या संकल्पनेत तीन घटक सामावलेले दिसतात. संवेदना, विचार आणि भावना हे तीन घटक होत. डोळे, नाक, कान, जीभ आणि त्वचा या पाच ज्ञानेंद्रिया मार्फत माणसांचे बाह्य सृष्टीशी क्रिया प्रतिक्रियात्मक व्यवहार चालू असतात. यापैकी कोणत्याही इंद्रियाद्वारा बाह्य सृष्टीचा लाभणारा संदेश, त्याला मेंदूकरवी दिले जाणारे प्रत्युत्तर आणि त्याचे माणसांच्या ठिकाणी संभवणारे परिणाम, ही सर्व प्रक्रिया पाहू जाता बाह्य गोष्टीच्या संयोगातून पहिल्यांदा संभवते. ती एंद्रिय संवेदना हे लक्षात येते.

ललित साहित्यातून अनुभव साकार होत असतात. सर्वंकष पर्यावरणात घडणाऱ्या अंतर क्रियेतून अनुभव साकार होतो. घटना आणि मन यांच्या संबंधाचा परिपाक म्हणजे अनुभव होय. अनु म्हणजे नंतर, भव म्हणजे साकार होणारा. व्यक्तीचा घटनेशी संबंध आल्यानंतर साकार होतो तो अनुभव होय. सर्वकष पर्यावरणात भौगोलिक, नैसर्गिक, सामाजिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अशा जीवनाच्या सर्वच अंगांचा अंतर्भाव होतो. नाना प्रकारच्या वस्तूंशी आणि घटनांशी व्यक्तीचा संबंध येतो. या विवेक्षित संबंधातून विविधा भाव व्यक्तीच्या प्रत्ययला येतात. या सर्वांना अनुभव असे म्हणता येते. नाना प्रकारचे संवेग, नाना प्रकारच्या भावना अनुभवणारा आणि संकल्प करणारा प्राणी आहे. या सर्वच संदर्भात मानवाचे मन जे प्रतिसाद देते, ज्या प्रतिक्रिया त्यात साकार होतात, त्यातून मानवाचा अनुभव साकार होत जातो. म्हणून सर्व ज्ञानाचा आरंभ अनुभवापासून होतो। असे इम्यन्यूअल कांट म्हटलेले आहे.

वेदनांच्या तपशीलाची छाननी करणे, त्याची आवश्यकतेनुसार निवड करणे, हे कार्य अवधानाच्या कक्षेत येते. या प्रक्रियेत योग्य त्या वेदनांची गुंफण मन करते. अवधान वेदन, संवेदन भावना आणि विचार या अनुभवांशी निगडित पायऱ्या आहेत.

## १) संवेदनात्मकता :

साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवाच्या विशेषामध्ये संवेदना हे महत्त्वाचे विशेष आहे. चित्तवृत्तीचा आधारभूत पाया संवेदनात सामावलेला असल्याने, एंद्रीय संवेदनात्मकता हा कलात्मक अनुभवांचा प्रधान विशेष बनतो. सर्वच कलांमध्ये एंद्रीय संवेदना जागृतीला महत्वाचे स्थान यामुळेच प्राप्त झालेले आहे. कलावंताच्या ठिकाणी तीव्र संवेदनक्षमता हवी. असे यासाठीच म्हटले जाते. कुमार गंधर्व सारखा गायक, रविशंकर सारखा सतारिया, अल्लारखा सारखा तबलजी इत्यादी भीन्न क्षेत्रातील कलावंत म्हणूनच मोठे आहेत. मराठीत बालकवींचे याबाबतीत विशेष उल्लेख करावा लागेल. मर्ढेकरांनी संवेदना जागृतीवर आधारित कलेविषयी, काव्याविषयी जो सिद्धांत मांडला तो महत्त्वाचा आहे.

## २) भावनात्मकता:

भावनात्मकता हाही अशा अनुभवांचा एक महत्त्वाचा विशेष आहे. कारण कलेच्या ललित साहित्याच्या संसाराचा आधारस्तंभ म्हणजे भावनाविलास होय. त्यामुळे या अनुभवात असणारा भावनेचा स्पर्श वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. बोंझाकीट या सौंदर्य शास्त्रज्ञाच्या मते सौंदर्य अनुभवात एक सुखद भावना असते. ललित साहित्याचा कोणताही प्रकार घेतला तरी त्यातील भावदर्शन नेहमीच महत्त्वाचे मानले गेले आहे.

## ३) वैचारिकता:

हा विशेषही भावणेसारखाच आहे. ललित साहित्यातून अविष्कृत होणाऱ्या अनुभवांच्या बाबतीत वैचारिकता हा विशेष जुळणारा नाही. असा सर्वसामान्य समज आहे. त्याचे स्थान ललितेतर किंवा शास्त्रीय साहित्यात असे म्हटले जाते. कारण तो ज्ञानाशी संबंधित असल्यामुळे, बुद्धी मार्गाशी निगडीत मानला जातो. पण ललित साहित्यालाही विचारांचे वावडे नसते. इथे पथ्य इतकेच पाळले गेले पाहिजे की, तो ललित साहित्याच्या अंगाने विकसित झाला पाहिजे. शास्त्रीय व ललितेतर साहित्यात तो फक्त विचार म्हणून नांदत असतो. हरिभाऊ आपटे यांची सामाजिक कादंबरी, केशवसुत, मर्ढेकर, विंदा करंदीकर यांची कविता, काकासाहेब खाडिलकर, तेंडूलकर, गो. पू. देशपांडे यांची नाटके इत्यादीचा विचार केला तर असे दिसते की, या कलाकृती काही एक निश्चित विचार, वैचारिक दृष्टिकोन आपल्याला देतात. त्यांचे साहित्य आनंद देते पण आनंदाबरोबर विचारही देते. याचे कारण त्यामागील अनुभवात असलेला विचारांचा बलवत्तर घटक हा आहे.

## ४)सूचकता:

हाही कलात्मक अनुभवांचा एक महत्त्वपूर्ण विशेष मानला जातो. सर्व स्पष्ट करून सांगण्यापेक्षा कलेचा भर नेहमी सुचविण्यावर असावा असे म्हटले जाते. Suggestion सूचकतेचे महत्व पाश्च्यात्य काव्यविचारानेही मांडले आहेत. संस्कृतातील ध्वनीविचार (ध्वनी म्हणजे सूचकता) या विशेषाचे महत्त्व सांगतो. आनंदवर्धनाने वस्तूध्वनी, अलंकारध्वनी आणि रसध्वनी अशी काव्यदृष्ट्या सलग श्रेणी सांगितली आहे. या सूचकतेमुळेच कलात्मक अनुभवांच्या ठिकाणी वसणाऱ्या लवचिकतेची कल्पना येऊ शकते. ललित साहित्यकृतीचे जे अनेक अर्थ असू शकतात ते त्यामागील अनुभवांच्या ठिकाणी बसणाऱ्या सूचकता या विशेषामुळेच.

## ५)विशिष्टता व विश्वात्मकता :

हे दोन्ही तर केवळ ललित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांचे विशेष म्हणता येतील. ललितेतर साहित्यामागील अनुभवात फक्त विश्वात्मकता हा विशेष असतो असे म्हणता येईल. कारण त्यावर तो शोधणाऱ्या, ज्याचा तो आहे त्याच्या विशिष्टत्वाचा ठसा उमटलेला नसतो. तो अनुभव सर्वार्थाने सर्वांचा असतो. उदाहरणार्थ न्यूटनचा गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत किंवा जगदीशचंद्र यांचा वनस्पतीच्या सजीवत्वाचा सिद्धांत हे सर्व लेखन फक्त विश्वात्मक झालेले असते. कारण त्या मागील अनुभव फक्त विश्वात्मक स्वरूपाचा असतो. खऱ्या अर्थाने व्यक्तिनिरपेक्ष झालेला असतो. पण ललित साहित्यामागचा अनुभव असा नसतो. तो व्यक्तीसापेक्ष असूनही व्यक्तिनिरपेक्ष होत असतो. उदाहरणार्थ कविता, विशिष्ट अनुभव जेव्हा काव्यातून व्यक्त होतो तेव्हा तो एकाच वेळी त्या कविचा राहून सर्वांचा होत असतो.

## ६) सेंद्रियत्त्व :

सेंद्रियत्त्व हाही साहित्य अनुभवाच्या बाबतीत लक्षात घेतला जाणारा खास विशेष आहे. तसा हा प्राणीशास्त्रगत शब्द आहे. व्लाडिमार वाइडले यांनी तो कलाकृतीच्या एकसंधतवाच्या संदर्भात वापरून आधुनिक काळातही त्याला समीक्षेच्या दरबारा नवी प्रतिष्ठा दिलेली आहे. सर्वप्रथम अरिस्टोटलने कलाकृतीच्या सेंद्रियत्वाची संकल्पना मांडली. सजीव शरीराप्रमाणे कलाकृतीची रचना हवी असे त्याचे मत होते. त्या दृष्टीने त्याने काही गमकांची मांडणी केली आहे. नंतर सौंदर्य अनुभवाच्या संदर्भात हेगेल या शास्त्रज्ञाने या शब्दाची प्रामुख्याने मांडणी केलेली दिसते. अनेकत्त्वातून होणारी एकत्वाची प्रतीती असे त्याचे तिथे मांडलेले स्वरूप आढळते. नाक, कान, हात, पाय इत्यादी अनेकविध अवयवांच्या वा घटकांच्या, चैतन्यमय एकत्रीकरणातून मानवी शरीराची एकात्म संघटना जशी संभवते, तशीच अनेकविध घटकांच्या आधारे साधली जाणारी एकात्म भाषिक संघटना म्हणजे कलाकृती वा साहित्यकृती आणि त्यामागील अनुभव होय.

थोडक्यात ललित साहित्यातून व्यक्त होणारा अनुभव जिवंत हवा, स्वतंत्र हवा, चैतन्यमय हवा आणि मुख्य म्हणजे अंतर्बाह्य सुसंघटित हवा. एकात्म हवा, असाच सेंद्रियतेचा यासंदर्भात अर्थ आहे.